जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2020
तरुण भारत

# डेक्कनच्या 'रचनाभद्राय' प्रदर्शनास उद्या प्रारंभ

कोल्हापूर : डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीअंतर्गत डिग्री आणि डिप्लोमा इंटेरिअर डिझाईन याविषयी शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाचे 'रचनाभद्राय' प्रदर्शन शाहू स्मारक, दसरा चौक, कोल्हापूर येथे दरवर्षी भरविले जाते. शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच या विषयाशी संबंधित विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध कलाकृतींचा यामध्ये समावेश असतो. शनिवार, १५ रोजी सकाळी १० वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन होणार असून आर्किटेक्ट प्रकाश चांडक प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रदर्शन १७ फेब्रुवारापर्यंत सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत सर्वांसाठी खुले राहील. प्रदर्शनास पालक, नागरिक आणि विद्यार्थी यांनी भेट द्यावी, असे आवाहन प्राचार्या सीमा मालाणी यांनी केले आहे.



कोल्हापूर : शहाजी छत्रपती महाविद्यालयातील वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी बोलताना डॉ. व्ही. डी नांदिवडेकर. शेजारी मान्यवर.

# अभ्यास, संशोधनासाठी मोबाईलचा वापर करावा

## डॉ. नांदिवडेकर : 'शहाजी'मध्ये पारितोषिक वितरण

रमणमळा, ता. १३ : 'भारतातील विद्यार्थ्यांचा वेळ मोबाईल वापरात वाया जात आहे, हे संशोधनातून सिद्ध झाले आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर आपल्या अभ्यास व संशोधनासाठी करावा,' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदिवडेकर यांनी केले. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण झाले. सचिव विजयराव बोंद्रे यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, ''जगभरात सर्वाधिक वापर करणारे विद्यार्थी आशिया खंडात आणि विशेषत: भारतात आहेत. मॅसेज फॉरवर्ड केल्यामुळे इंटरनेटवर ट्रॅफिकही जाम होत आहे. विद्यार्थ्यांनी हा वेळ वाया घालवण्याऐवजी अभ्यासासाठी, आवडीच्या क्षेत्रात संशोधनासाठी नावीन्यपूर्ण गोष्टी आत्मसात करण्यासाठी मोबाइलचा वापर करावा. यामुळे विद्यार्थ्यांची प्रगति होईल. मोबाइलचा गैरवापर टाळला जाईल.''

प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांनी प्रास्ताविक केले. प्राध्यापक आणि इतरांनी दिलेल्या सव्वाचार लाख रुपयांच्या ठेव रक्कमातून मिळालेल्या व्याजातून विद्यार्थ्यांना विविध प्रकारची रोख पारितोषिक प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. संचालक राजेंद्र जाधव- कसबेकर, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर, प्रा. सुधाकर मानकर, प्राचार्य डॉ. शानेदिवाण आणि देणगीदार मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गौरव केला. प्रा. प्रशांत पाटील यांनी स्वागत केले. प्रा. राज. बिरजे, प्रा. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पांडुरंग पाटील यांनी परिचय करून दिला. प्रा. डॉ. डी. एल. काशिद-पाटील, प्रा. ए. बी. शेळके यांनी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांच्या नावाचे आणि पारितोषिकांचे वाचन केले. प्रा. डॉ. डी. के. वळवी यांनी आभार मानले. अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, प्रबंधक रवींद्र भोसले, अधिक्षक मनिष भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी टोल फ्री क्रमांक चालू करण्यात आला आहे. सदर टोल फ्री क्रमांक पुढीलप्रमाणे आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**टोल फ्री नं. : 18002334871**

ठिकाण : कोल्हापूर

दि. १४/०२/२०२०

सही/-

**डॉ. विलास नांदवडेकर**

कुलसचिव

# विद्यापीठात संख्याशास्त्र विभागातर्फे आज राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागामध्ये 'ॲडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मॉडेलिंग ॲंड इन्फेरेन्स' या विषयावर शुक्रवार (दि.१४) पासून विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र अधिविभागातील नीलांबरी सभागृहात दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. कोलकाता येथील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या अप्लाइड स्टॅटिस्टिक्स विभागामधील प्रा. डॉ. मौसमी बोस बीजभाषण करणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाकडून युद्धपातळीवर तयारी : 'आयआयक्यूए' अहवाल मान्य

# नॅक मूल्यांकनासाठी उद्या 'एसएसआर' होणार सादर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेच्यावतीने (नॅक) करण्यात येणाऱ्या मूल्यांकनासाठी शिवाजी विद्यापीठाकडून युद्धपातळीवर तयारी सुरु आहे. मूल्यांकन समिती (नॅक)ला विद्यापीठाकडून सेल्फ स्टडी रिपोर्ट (एसएसआर) उद्या, शनिवारी सादर केला जाणार आहे.

## विविध निकषांनुसार माहिती

अभ्यासक्रम, अध्ययन व अध्यापन, संशोधन आणि समाजाभिमुख भूमिका, पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांना पाठबळ, प्रशासन, उपक्रम व योजना, वेगळेपण या विविध निकषांनुसार विद्यापीठाची विश्लेषणात्मक आणि संख्यात्मक माहिती 'एसएसआर'मध्ये आहे. ती पोर्टलवर भरली जाणार आहे. त्याची पडताळणी प्रश्नावलीच्या माध्यमातून 'नॅक'कडून केली जाणार आहे.

## मूल्यांकनासाठी महत्त्वाचा अहवाल

मूल्यांकनाच्या नव्या स्वरुपात 'एसएसआर' महत्त्वाचा आहे. हा अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. विद्यापीठाच्या प्रशासनातील विभाग आणि विविध अधिविभागांकडून आवश्यक ती माहिती घेतली आहे. 'एसएसआर' उद्या, शनिवारी सादर केला जाणार आहे, अशी माहिती अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी गुरुवारी दिली.

मूल्यांकनाच्या बदललेल्या स्वरुपानुसार विद्यापीठाकडून तयारी करण्यात येत आहे. विविध अधिविभाग आणि प्रशासकीय विभाग, विद्यार्थी, महाविद्यालय, अभ्यासक्रम, संशोधनविषयक माहिती विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने संकलित करुन त्याचा इन्स्टिट्युशन इन्फॉर्मेशन फॉर क्वॉलिटी अॅश्युरन्स (आयआयक्यूए) अहवाल तयार केला. हा अहवाल डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात 'नॅक'च्या पोर्टलवर जमा करण्यात आला. हा अहबाल समितीकडून मान्य झाला आहे. त्यापुढील दुसरा टप्पा असणारा 'एसएसआर' उद्या, शनिवारी नॅकच्या पोर्टलवर सादर केला जाणार आहे. या अहवालानुसार विद्यार्थी समाधान सर्वेक्षण, सादर केलेल्या माहितीची पडताळणी करुन काही सूचना 'नॅक'कडून करण्यात येतील. त्याची पूर्तता केल्यानंतर नॅक समिती मूल्यांकनासाठी येणार आहे.



**कोल्हापूर : 'कोल्हापूर लिक ऑफ युनिक सायक्लोथॉन २०२०'चा प्रारंभ करताना आ. ऋतुराज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, रोटरीचे प्रांतपाल संग्राम पाटील, करवीरचे पोलिस उपअधीक्षक प्रशांत अमृतकर आदी.**

# रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर इव्हॉल्वतर्फे दिव्यांगत्व जागृती रॅली

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर इव्हॉल्वतर्फे दिव्यांगत्वाबद्दल जनजागृती व्हावी म्हणून 'कोल्हापूर लिक ऑफ युनिक सायक्लोथॉन २०२०' शीर्षकांतर्गत सायकल रॅलीला सुरुवात करण्यात आली. जर्मनीतील अर्धांगवायू चॅम्पियनशिप विजेता सायकलपटू स्टिफन वूरमन्स यांची या रॅलीला असलेली उपस्थिती विशेष आकर्षण ठरली.

ही रॅली कोल्हापूरहून नाशिकमार्गे मुंबईपर्यंत जाणार आहे. ६५० किलोमीटरचे हे अंतर ७ दिवसांत कापण्याचा सहभागींचा मनोदय आहे. 'रत्ननिधी' तसेच 'इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स' या संस्थांचा या उपक्रमात सक्रिय सहभाग आहे. आमदार ऋतुराज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, रोटरीचे प्रांतपाल संग्राम पाटील, करवीरचे पोलिस उपअधीक्षक प्रशांत अमृतकर रॅलीच्या उद्घाटनाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते रॅलीला हिरवे झेंडे दाखवण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर इव्हॉल्वसह अर्हता, डीएससी, केएससी आणि रगेडियन या स्थानिक क्रीडा संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.